# प्रा. कतुरवार यांची मुंबई विद्यापीठ समितीवर नियुक्ती



बालाजी कतुरवार

देगलूर, ता. १० (बातमीदार) : देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख प्रा. डॉ. बालाजी राजेश्वर कतुरवार यांची मुंबई विद्यापीठाच्या संशोधन व मान्यता समितीवर विषयतज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रा.बी.आर. कत्तुरवार हे देगलूर महाविद्यालयात पदवी व पदव्यूतर वर्गास लोकप्रशासन विषयाचे अध्यापक म्हनूण मागील २२ वर्षापासून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ७ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. सध्या ५ विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. ते सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे सदस्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ राज्यस्तरीय सल्लागार समितीचे सदस्य, चेतना स्वायत महाविद्यालय मुंबईच्या अभ्यास मंडळाचे सदस्य, द फोरम ऑफ पब्लिक एडमिनीस्ट्रेशनचे अध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मुंबई विद्यापीठातील संशोधन व मान्यता समिती सदस्यपदी नियुक्तीबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन जयराम चिद्रावार, सचिव शशिकांत नारायणराव चिद्रावार, सहसचिव राजकुमार राम महाजन, कोषाध्यक्ष विलास शंकरराव तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार, देवेंद्र बालाजीराव मोतेवार, नारायणराव रामन्ना मैलागिरे, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Scanned with OKEN Scanner